# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक : १८८/२०२१

**Ph. D. Admission Process 2021**

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याबाबत....**

विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथील पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यापीठ परिपत्रक क्र. १८६/२०२१ दि. १० जुलै, २०२१ अन्वये पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. मान्यताप्राप्त संशोधन केंद्र व विद्यापीठ विभाग येथे कार्यरत असलेल्या मार्गदर्शकांकडील रिक्त असलेल्या जागा विचारात घेऊन प्रवेशाची कार्यवाही करण्यात येते.

सन २०२१ मध्ये करावयाच्या पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडून त्यांच्याकडे रिक्त जागांची माहिती विद्यापीठ परिपत्रक क्र. ९७/२०२१ दि. ०१/०४/२०२१ अन्वये http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx या लिंकव्दारे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेली होती. त्यानुसार मार्गदर्शकांनी अद्ययावत केलेली जी माहिती संबधित संशोधन केंद्र/विद्यापीठ विभाग यांनी रिक्त जागांची पडताळणी करून आपल्या लॉगीनवरून अद्ययावत केलेली आहे अशा मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती संदर्भ क्र. पीजीएस/२५०७ दि. १० जुलै, २०२१ नुसार विद्यापीठ संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात आलेली आहे.

तथापी, मार्गदर्शक/संशोधन केंद्र यांना रिक्त जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी दिलेल्या अंतिम मुदतीनंतर नव्याने जागा निर्माण झालेल्या आहेत तसेच काही शिक्षकांना नव्याने मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेली आहे. सदर बाब विचारात घेता, यासंदर्भात पुनश्चः कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त मार्गदर्शकांनी परिपत्रक क्र. ९७/२०२१ दि. ०१/०४/२०२१ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार Declare Ph.D. Vacancy 2021 या लिंकवर आपल्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती स्व:ताच्या Teacher Login वरून ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावरून http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx या लिंकव्दारे दि. २४/०७/२०२१ पर्यंत आपल्या संशोधन केंद्रामार्फत अद्ययावत करावी.

—२

ज्या मार्गदर्शकांना शैक्षणिक वर्ष २०२१ मध्ये विद्यार्थी घ्यावयाचे नसतील त्यांनीही आपल्याकडे नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती सादर करणे आवश्यक आहे. दि. २४/०७/२०२१ नंतर रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही तसेच ई—मेल अथवा पत्राव्दारे पाठविलेली माहिती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :—

- ई—मेल आयडी :— phd.mphiladmis@pun.unipune.ac.in
- दुरव्धनी क्र. :— ०२० —२५६२१२२७
- **माहिती अद्ययावत करण्यासाठीची लिंक :—** http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx

उत्तम रा. चव्हाण
**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/२५७०
दिनांक : १३/०७/२०२१

प्रत :—

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.